# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार

सेक्टर०५, रामनगर शांती गार्डन मिरारोड पुर्व ठाणे
४०११०७
Email pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३६९-२२ दिनांक ०४/१२/२०२२

## घरफोडी, मोबाईल चोरी, दरोडा, खुनाचा प्रयत्न करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन मुद्देमाल हस्तगत- मांडवी पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक १७/०७/२०२२ रोजी मांडवी पोलीस ठाणे हददीमधील नालेश्वरनगर, खैरपाडा, ता. वसई,जि. पालघर या ठिकाणी कोणीतरी अनोळखी इसमाने फिर्यादींच्या घराच्या किचनच्या खिडकीचे ग्रिल तोडून त्यावाटे आत प्रवेश करुन घरातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल, रोख रक्कम आणि एटीएम कार्ड असा एकूण १९,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल रात्रौ घरफोडी चोरी केल्याने मांडवी पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ६३/२०२२ भा.दं.वि.स. कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरिष्ठांच्या सुचनेप्रमाणे मांडवी पोलीस ठाण्यामध्ये घरफोडी, मोबाईल चोरीचे दाखल असलेले अन्य गुन्हयांचा तपास गुन्हे प्रकटिकरण अधिकारी आणि अंमलदार यांच्याकडुन सुरु होता. वर नमुद गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोबाईलचा तांत्रिक तपास करुन गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध सुरु होता.

नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी अब्दुल रेहमान ताहीर बडु, वय- २८ वर्षे,रा. जामा मस्जीदजवळ, काठीयावाडी हॉटेलच्या मागे, पेल्हार, नालासोपारा (पुर्व), ता. वसई,जि. पालघर याचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरुन गुन्हे प्रकटिकरण अधिकारी व पथक यांनी सदर आरोपीला सापळा कारवाई करुन ताब्यात घेतले. गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईल व इतर गुन्हयातील एकुण ८१,८९७/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अटक आरोपीत याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ७४६/२०२२ कलम ३८० भां.दं.वि.स. अन्वये गुन्हा केल्याचे निष्पन्न झालेले आहे. तसेच अरोपीत याने इतर पोलीस ठाणे हद्दीमध्ये घरफोडी, मोबाईल चोरी मंदीदात चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यादृष्टीने तपास सुरु आहे. सदर आरोपीवर सन २०१४ मध्ये लुक आउट सर्क्युलर नोटीस ही जारी करण्यात आलेली

होती. अटक आरोपी याच्यावर यापुर्वी दाखल असलेल्या गंभीर गुन्हयाची माहिती खालीलप्रमाणे

| अनु.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजिस्टर नंबर, कलम |
|---|---|---|
| १. | काशिमीरा पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र. ७४६/२०२२ कलम ३८० भां.दं.वि.स |
| २. | काशिमीरा पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र. ६०७/२०१८ कलम ३९७,३०७,३२६,४५२ भादंविसं कलम ३७(१) १३५ महा.पोलीस अधिनियम |

वर नमुद अटक अरोपी याने पोलीस कस्टडी दरम्यान मांडवी पोलीस ठाण्याच्या पहिल्या माळयावरील खोलीच्या खिडकीच्या स्लायडींग मधुन खाली उडी मारुन अंधाराचा फायदा घेवुन मांडवी पोलीस ठाण्याच्या पाठीमागील जंगलामध्ये पसार झालेला होता. सदरबाबत आरोपीवर गुन्हा नोंद क्र. १८६/२०२२ कलम २२४ भादंविसं अन्वये दाखल करण्यात आला. मांडवी पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अहोरात्र परिश्रम घेवुन संपुर्ण जंगल परिसर तसेच भामटपाडा आणि कोपर गावातील जंगल शोध घेवुन स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आरोपीचा शोध घेवुन सदर आरोपीला दि. ०४/१२/२०२२ रोजी कोपर गावाच्या जंगलामधुन ताब्यात घेतलेले आहे.

सदर कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. प्रफुल्ल वाघ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मांडवी पोलीस ठाणे, सपोनि संदिप सावंत, पोउपनि. राजशेखर सलगरे, अभिजीत टेलर, स.फौ. मोकल, पो.हवा. घेगडमल, मोरे, पो.अं. साळुंखे, मासाळ, कोरे, मोहळकर तसेच पोलीस ठाण्यातील इतर सर्व पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी केलेली आहे